| MHKO200000332024 | **नियमीत दिवाणी दावा क्रं. ५/२०२४ मधील नि.क्रं. १२ खालील आदेश**<br><br>**श्री.भावेश्वरी विकास सेवा संस्था मर्या. बाजार भोगाव तर्फे व्हा. चेअरमन बाळू नाना बने विरुध्द ग्रामपंचायत बाजारभोगाव तर्फे ग्रामसेवक वगैरे** |
|---|---|

वादी यांनी सदरचा दावा कायम मनाईकरीता व आज्ञार्थी मनाईसाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (ड) प्रमाणे दावा चालणेस पात्र नसल्याने काढुन टाकण्यात यावा यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा बाजारभोगाव ग्रामपंचायत हद्दीतील भू मापन गट नं. २९५ क्षेत्र ०.७२ गुंठे पैकी मालमत्ता क्रं. ६३९ याचे क्षेत्र ४३०० चौ.फुट व त्यावरील अर्धे पक्के घर ४३ फुट रुंद व २३ फुट व पडसर खुली जागा १०० फुट लांब व ४३ फुट रुंद चतु:सिमेतील गोडाऊन वजा बांधकाम व पडसर जमीन या मिळकती बाबत वादीचे शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी कोणत्याही प्रकारे हर हरकत व अडथळा करु नये व दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे पत्र्याच्या अपु–या वजा दुकान गाळयाचे बांधकाम करु नये अगर दावा मिळकतीचे स्वरुप बदलू नये अशी प्रतिवादी व तर्फे इसमांचे विरुध्द कायम मनाई ताकीद व्हावी व मिळकती मधील जमीन दोस्त केले गोडावून प्रतिवादी यांनी वादी संस्थेस स्वखर्चाने बांधून दयावे असा दावा दाखल केला आहे.

**०३.** वादी यांनी सदर दावा कोणत्या अधिकारात दाखल केला आहे याचा उल्लेख दाव्यामध्ये केलेला नाही. तसेच तो कोणत्या हक्कात दाखल केला

आहे हे सुध्दा नमुद केलेले नाही. तसेच वादी हे दावा मिळकतीमध्ये मालक व वहिवाटदार कोणत्या अधिकारात झाले किंवा मालकी बाबतचा कोणताही दस्त याकामी दाखल केलेला नाही. या कारणास्तव वादी यांना सदर मिळकतीत कायद्याने मालकी येत नसल्याने प्रथम दर्शनी दावा फेटाळण्यास पात्र आहे. प्रतिवादी क्रं. २ ही स्वायत्त संस्था असून ती ग्रामपंचायत अधिनयमानुसार नोंदणी कृत स्वायत्त संस्था आहे. ग्रामपंचायती विरुध्द दावा दाखल करावयाचा झाल्यास मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम ५३ प्रमाणे नोटीस देणे बंधनकारक असते अन्यथा दावा दिवाणी न्यायालयात चालवण्याचा अधिकार नाही. सदर दाव्यात वादी यांनी ग्रामपंचायत यांना नोटीस बजावणी न करता दावा दाखल केला आहे. सदरचा दावा मुंबई ग्रामपंचायत अधिनियम कलम ५३ प्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ७ नियम ११(ड) प्रमाणे काढून टाकण्यास पात्र आहे.

**०४.** बाजार भोगाव येथील गट नं. २९५ ही शासनाच्या मालकीची मिळकत आहे. सदर मिळकतीमध्ये व्यक्तीशा अथवा कोणतीही संस्था मालक नाही. सदर मिळकतीचा मालकी बाबतचा ताबा शासनाकडे आहे. सदर मिळकत ही सार्वजनिक उपयोगासाठी, खेळाचे मैदान, उद्यान, बाजार, वाहन तळ, एस.टी.करीता राखीव म्हणून ठेवलेली आहे. त्यांची देखभाल संबंधीत ग्रामपंचायत यांनी करण्याचा आहे असा शासन जी.आर. आहे. त्यामध्ये केलेले अतिक्रमण काढून घेण्याचा अधिकार ग्रामपंचातीला दिला आहे. अशी वस्तुस्थिती असाताना कोणत्याही मालकी हक्काच्या कागदाशिवाय प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे तो फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**०५.** वादी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्रं. १६ वर दाखल केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांच्या प्रस्तुत अर्जातील संपूर्ण

मजकूर खोटा व लबाडीचा व चुकीचा असून तो वादी यांना मान्य व कबूल नाही. वादी यांनी सदरचा दावा कोणत्या हक्कात व अधिकारात दाखल केला आहे याबाबत संपूर्ण खुलासा दाव्यात केला आहे. सदर दावेस दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) प्रमाणे दाव्यास बाधा येत नाही. तसेच सदरचा दावा हा वादीनी कायम व आज्ञार्थी मनाईसाठी दाखल केला आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीनुसार नोटीससंदर्भात आवश्यक तो खुलासा वादींनी दाव्यामध्ये केला आहे. सदर मिळकतीत वादीची शांततामय कब्जे वहिवाट आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचा सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०६.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सदर दाव्यातील कथनांचे व दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, वादीने प्रस्तुतचा दावा कायम व आज्ञार्थी मनाईकरीता दाखल केला आहे. प्रतिवादींच्या मते प्रस्तुत दाव्यात दावा मिळकतीत वादीला दावा दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही. तसेच सदर दावा कोणत्या हक्कात दाखल केला आहे ते नमुद केले नाही. तसेच वादी हे दावा मिळकतीमध्ये मालक व वहिवाटदार कोणत्या अधिकारात झाले किंवा मालकी बाबतचा कोणता दस्त प्रस्तुत कामी हजर केलेला नाही. तसेच दावा दाखल करताना ग्रामपंचायतीला नोटीस देखील दिलेली नाही. तसेच दावा मिळकत ही प्रतिवादीच्या देखरेखीखाली आहे. तर वादी यांनी त्यांची दावा मिळकतीमध्ये कब्जे वहिवाट आहे हे दर्शविण्यासाठी गावनमुना ८–अ चा उतारा व कराच्या पावत्या ज्या की प्रतिवादी ग्रामपंचायतीनेच अदा केल्या आहेत. सद्यस्थितीत दाव्यात अजुन पुरावा सुरु झालेला नाही. तसेच दाव्यात पुरावा दाखल करण्याचा दोन्ही पक्षकारांना मुभा रहाणार आहे. त्यामुळे पुराव्यानिशीच गुणदोषावर अंतिम निर्णय होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे उचित होईल. वरील सर्व कारणांचा

एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

VAISHALI AMOL LAVAND-KOKATE

Digitally signed by VAISHALI AMOL LAVAND-KOKATE
Date: 2025.06.23 17:45:47 +0530

( व्ही.ए.लावंड–कोकाटे )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कळे–खेरीवडे.

कळे–खेरीवडे
दि.२३.०६.२०२५.